**SAKAL , Wednesday, May 12, 2010**



नुकत्याच संपलेल्या चौथ्या तिमाहीत ३१.१३ टक्क्यांची वाढ झाली असून, जानेवारी ते मार्च २०१० या कालावधीतील बॅंकेचा निव्वळ नफा १ हजार १३५ कोटी रुपये आहे. बॅंकेचे या कालावधीतील एकूण उत्पन्न आधीच्या ६ हजार ४७ कोटी ९४ लाख रुपयांपेक्षा अधिक ६ हजार ४६० कोटी ७८ लाख रुपये झाले आहे. २००९-१० या एकूण आर्थिक वर्षात मात्र बॅंकेचा निव्वळ नफा २६.३५ टक्क्यांनी वाढून तो यंदा एकूण ३ हजार ९०५ कोटी ३५ लाख रुपयांचा झाला आहे. बॅंकेच्या संचालक मंडळाने १० रुपये दर्शनी [illegible] रुपयांच्या (१२० टक्के) ला[illegible]चा शिफारस केली आहे.

## पर्सोना-कॅट्स ॲकॅडमी करार

पुणे, ता. ११ : पर्सोना ग्लोबल आणि कॅट्स ॲकॅडमी यांच्यात नुकताच करार झाला आहे. यावेळी कॅट्स ॲकॅडमीचे संस्थापक सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल बापट या वेळी उपस्थित होते. पर्सोना ही कंपनी जागतिक पातळीवर फॉर्च्युन १००० कंपन्यांना विविध प्रकारची सोल्यूशन देते. कॅट्स ही संस्था प्रशिक्षण, सल्ला, कोचिंग आदी कंपन्यांना आणि व्यक्तिगत पातळीवर देते. 'पर्सोना'शी केलेल्या करारामुळे 'कॅट्स' कस्टरम एक्स्पिरियन्स मॅनिजमेंट प्लस, सेल्स कॉम्पिटन्सी ॲसेसमेंट, टॅलेंट मॅनिजमेंट प्रोसेस आदी मेथडॉलॉजी आणि टूल्स देणार आहे, असे कळविले आहे.

मुंबई, ता. ११ (पीटीआय) : देशातील ग्रामीण बाजारपेठेत पाय रोवण्यासाठी सज्ज झालेल्या यामाहा मोटर्सतर्फे सर्वसामान्यांना परवडतील अशा मोटारसायकलींचे उत्पादन करण्यात येणार आहे, अशी माहिती कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. साधारणत: चालू वर्षाच्याअखेरीस या मोटारी बाजारपेठेत दाखल होण्याची शक्यता आहे.

कंपनीचे नॅशनल बिझनेस प्रमुख पंकज दुबे म्हणाले, "देशातील पहिल्या आणि दुसऱ्या श्रेणीच्या शहरांमध्ये कंपनीची पाळेमुळे मजबूत आहेत. भविष्याचा विचार करता आम्ही ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. ग्रामीण भागातील ग्राहकाची गरज ओळखून त्याला परवडणाऱ्या मोटारसायकली या निमित्ताने सादर करण्याची यामाहाची योजना आहे. सध्या कंपनीच्या एकूण विक्रीपैकी १५ टक्के विक्री ग्रामीण भागात होत असून, लवकरच हे प्रमाण वाढविण्याचा आमचा उद्देश आहे. देशाचा विचार करता एकूण मोटारसायकल विक्रीच्या ७० टक्के मोटारी ग्रामीण भागात विकल्या जात आहेत. हे प्रमाण लक्षात घेता यामाहा परवडणाऱ्या मोटारसायकलींवर भर देणार आहे."

ग्रामीण भागातील एकूण व्यवसाय वाढविण्यासाठी देशातील तृतीय श्रेणीच्या शहरांतील नेटवर्क आणि वितरकांचे जाळे वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून कंपनीतर्फे नुकतीच वायबीआर ११० ही नवी मोटारसायकल सादर केली आहे. यास ग्रामीण भागातून चांगला प्रतिसाद लाभला असून, आतापर्यंत चार हजार युनिट्सची विक्री झाल्याचेही दुबे यांनी सांगितले. ग्रामीण भाग नजरेसमोर ठेवून बनविण्यात आलेल्या यामाहा क्रक्सला मोठा प्रतिसाद लाभला असून, वायबीआरलाही तसाच प्रतिसाद लाभेल, असा विश्वासही दुबे यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागावरील पकड मजबूत करण्यासाठी ही दोन्ही मॉडिल्स कंपनीला लाभदायक ठरतील असेही त्यांनी सांगितले.

एप्रिल २०१० मध्ये कंपनीने १६,८६१ वाहनांची विक्री नोंदवीत गतवर्षीच्या तुलनेत ११.५१ टक्क्यांची वाढ प्राप्त केली. कंपनी लवकरच यामाहा बाईक कॉर्नर या नावाने डीलरशिप विकसित करीत असून, चालू वर्षात २५० वितरकांची नेमणूक करण्यात येईल. या माध्यमातून ग्रामीण भागात विक्रीपश्चात सुविधा दिल्या जातील, असे दुबे यांनी सांगितले.

ॲवॉर्डस २०१० मध्ये आयडिया सेल्युलरला दूरसंचार क्षेत्रातील 'मोस्ट कस्टमर रिस्पॉन्सिव्ह कंपनी' म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट ग्राहक सेवा देऊ करण्याप्रती आयडियाची बांधिलकी आणि ग्राहकांना समाधान मिळावे, याकरिता चाललेले सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळेच अर्नेस्ट अँड यंग, निल्सन आणि अवाया ग्लोबलकोनेक्टच्या वरिष्ठ सभासदांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाने आयडियाला सदर पुरस्कार दिला. दूरसंचार सेवा क्षेत्रात आयडिया सेल्युलर करत असलेल्या नवीन आणि अद्ययावत ग्राहक सेवा तसेच डिलिव्हरीविषयक उपक्रम लक्षात घेऊन दि अवाया ग्लोबल कस्टमर रिस्पॉन्सिव्हनेस ॲवॉर्ड देण्यात आले. यावर्षी पुरस्कारांसाठी १२४ नामांकनांतून निवडण्यात आलेल्या ११ विजेत्यांमधून आयडियाची निवड करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| आयसीआयसीआय बॅंक | ९१८.०० | -०.४४ | सन फ |
| आयडिया | ५९.७० | -५.२४ | सुझलॉ |
| आयडीएफसी | १५८.९५ | -२.०० | टाटा मं |
| इन्फोसिस | २६५८.०० | -०.६६ | टाटा प |
| आयटीसी | २५८.८० | -१.१५ | टाटा स |
| जिंदाल स्टील | ६७१.०० | -२.९९ | टीसीए |
| जेपीअसोसिएट | १३३.३० | -०.७८ | युनिटे |
| कोटक बॅंक | ७४३.७० | -२.२६ | विप्रो |

## रणबक्षी तोट्यातून

मुंबई, ता. ११ : भारतीय औषध निर्मिती क्षेत्रात ५ टक्के हिस्सा राखणाऱ्या रणबक्षी कंपनीने मार्च २०१० अखेर संपलेल्या तिमाहीत ९६० कोटी ५८ लाख रुपयांचा नफा कमावला आहे. कंपनीला याच वर्षातील तिसऱ्या तिमाहीत ७६७ कोटी ३३ लाख रुपयांचा तोटा झाला होता. जानेवारी ते मार्च

# बॅंक ऑफ महाराष्ट्रला ४३९ कोटींचा निव्वळ नफा

### ठेवी ६३.३०४ कोटी रुपयांच्या वर

पुणे, ता. ११ : बॅंक ऑफ महाराष्ट्रने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाअखेरीस ४३९.५८ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळालेले उत्पन्न १३२.३४ कोटी रुपये आहे. व्याजाव्यतिरिक्त मिळालेले. उत्पन्नही वाढून ५९१.२४ कोटी रुपये

**बाजारपेठा**

# घाऊक बाजारपेठेत सर्व वस्तूंचे भाव स्थिर

(दि पूना मर्चंट्स चेंबरकडून)
पुणे, ता. ११ : आज येथील घाऊक बाजारपेठेत सर्व वस्तूंचे भाव स्थिर होते.

**खाद्य तेलांचे भाव**
(१५ किलो/लिटर)
शेंगदाणा तेल ..... १०२५-११५०

सरकी ..... ३५००-३८००
सेला बासमती ..... ४७००-५७००
**गहू**
सौराष्ट्र लोकवन ..... १९५०-२०५०
मध्य प्रदेश लोकवन ..... १५००-१९००
२१८९ : ..... १३७५-१४७५
सिहोर ..... २१७५-२७७५

हरभराडाळ ..... २६००-२८००
मूगडाळ ..... ८६००-८९००
मसूरडाळ ..... ४४५०-४५५०
मटकीडाळ ..... ८८००-८९००
उडीदडाळ ..... ६९००-७२००
**कडधान्ये :**
हरभरा ..... २२००-२३००
हुलगा ..... २०००-२२००

इंदौर (एम.पी.) ..... ३०००-३५००
**धने :**
गावरान ..... ३०००-३५००
इंदूर नं. १ ..... ४०००-४५००
**पेंड :**
सरकी पेंड : ..... १२८०-१३००
शेंग पेंड : ..... १८५०-२८००
**मका :**

बेसन (५० किलो) ..... १६२०-१७००
मीठ :
मीठ खडे (५० किलो) ..... १००
मीठ दळलेले ..... १३०
गोटा खोबरे (१०किलो) ..... ५१०-५२०
**नारळ (शेकडा) :**

पुना ..... ३००-६००
**फळभाजी :**
भेंडी :
पुसेसावळी ..... १५०-२८०
गवार : ..... १४०-२३०
टोमॅटो : ..... ४०-८०
मटार : ..... ३५०-६००
घेवडा : श्रावणी ..... २००-४००

केळी ..... ५०-६०
पावटा ..... १५०-१८०
बीट ..... ४०-७०
डिंगरी ..... १००-१४०
पावटा ..... २००-४००
वालवर ..... १६०-२५०
वाल ..... १६०-१८०
शेवगा ..... १००-१८०

डेलिशियस (पेटी) ..... ५०
वॉशिंग्टन : बॉक्स १५०
फ्युजी : बॉक्स ..... ७०
पिअर : बॉक्स ..... ७५
द्राक्षे :
कॅरेट ..... ३
केव्ही : बॉक्स ..... ३
डाळिंब :